**वाचाः-** १. शासन निर्णय ,अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्रमांक-साखर २०१४/प्र.क्र.७७/ना.पु.१९ दिनांक १९ जुन २०१४

२. मा.उपसचिव अन्न, नागरी पुरवठा यांचे अ.शा.पत्र.क्र.साखर-२०१४/प्र.क्र.७७/ना.पु.१९ दि. ०५ जुलै २०१४

३. मा. अवर सचिव ,अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे अ.शा.पत्र.क्र.साखर- १११७ / प्र.क्र.४६/ ना.पु.१९ दिनांक १२ एप्रिल २०१७

४. ED And F Man Commodities India Pvt.Ltd. Mumbai यांचा करारनामा दिनांक. १५.०३.२०१७

जा.क्र.२०१७/पुरवठा/प्रशा-५/नि.सा./कावी- १११

जिल्हाधिकारी कार्यालय (पुरवठा) जालना

दिनांकः- २६.०४.२०१७

**आदेश**:-

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत जालना जिल्हयासाठी माहे मे २०१७ करीता साखर प्रति किलो रु.१५.०० या दराने, पुर्वीच्याच लाभार्थ्यांना म्हणजे दारीद्रय रेषेखालील व अंत्योंदय योजनेतील लाभार्थ्यांना प्रतिव्यक्ती, ५०० ग्रॅम (प्रौढ अथवा मुल/बालक असा भेदभाव न करता) वितरण करावयाचे आहे.

माहे मे २०१७ च्या नियतनाची उचल वीस दिवसाच्या आत करावयाचे निर्देश असुन पहील्या दहा दिवसात ४०% साखरेचा पुरवठा उर्वरीत दहा दिवसात ६०% पुरवठा करण्याबाबत कळविले आहे. पुरवठादारांनी साखर एस-३० दर्जाची रिफाइन पांढरी शुभ्र चांगल्या प्रतीची ५० किलोच्या पॉली पॉलिप्रॉपिलीन (P.P.) बॅगमध्ये साखर पुरविण्याबाबत कळविले असुन बॅगाचे निव्वळ वजन १६० ग्रॅम असले पाहिजे.

**तालुकानिहाय नियतन :- ५०० ग्रॅम प्रतिव्यक्ती प्रमाणे.**

| अ.क्र. | तालुक्यांचे नांव | शासकीय गोदामांचे नांव | मंजुर नियतन (क्विंटल मध्ये) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | जालना | शासकीय गोदाम अंबड रोड जालना | ६९६ | |
| २ | बदनापुर | शासकीय गोदाम टि.एफ.जालना | २१७ | |
| ३ | भोकरदन | शासकीय गोदाम भोकरदन | ४९५ | |
| ४ | जाफ्राबाद | शासकीय गोदाम जाफ्राबाद | ३७८ | |
| ५ | परतुर | शासकीय गोदाम परतुर | ३३२ | |
| ६ | मंठा | शासकीय गोदाम मंठा | ३९५ | |
| ७ | अंबड | शासकीय गोदाम अंबड | ६३४ | |
| ८ | घनसावंगी | शासकीय गोदाम घनसावंगी | ५४३ | |
| | | **एकुण** | ३६९० | |

तहसीलदार यानी साखरेचे नियतन हे शासन पत्र क्र.११९०/१८५५/४४६६, दिनांक १५ जुन १९९० अन्वये वाटप करावे. साखर पुरवठादार हे विहीत मुदतीमध्ये साखर उचल करतील याबाबत तहसीलदार यांनी विशेष काळजी घ्यावी. तसेच साखर पुरवठादार यांनी विहीत मुदतीमध्ये साखर पुरविली नाही तर त्याचा अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा.

**जिल्हा पुरवठा अधिकारी**
**जालना**

PUT UP

**प्रतिलिपीः-**

१. मा. आवर सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहंक संरक्षण विभाग, नापु १९, मंत्रालय विस्तार मुंबई- ३२

२. मा. उपसंचालक अन्न,नागरी पुरवठा आयुक्ताचे कार्यालय फ्रि प्रेस जनरल मार्ग ५ मुंबई- २१

३. मा. वित्तीय सल्लागार व उपसचिव अन्न, नागरी पुरवठा विभाग, महाराष्ट्र शासन जी.टी. हॉस्पिटल कॉम्पलेक्स इमारत, ८ वा मजला लोकमान्य टिळक मार्ग मुंबई- ४००००१

४. मा. उपआयुक्त (पुरवठा) औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

५. उपविभागीय अधिकारी जालना, भोकरदन, परतुर, अंबड यांना माहितीस्तव देण्यात येते.

६. ED And F Man Commodities India Pvt.Ltd. Mumbai (साखर पुरवठादार) यांना देवून कळविण्यात येते की, शासन पत्र दिनांक १९.०४.२०१४ मधील सर्व अटी व शर्ती आपणास बंधनकारक असुन जिल्हयासाठी देण्यात आलेली ३६९० क्विंटल साखर ३९६४/- प्रतीक्विंटल या दराने साखर एस-३० दर्जाची रिफाइन पांढरी शुभ्र चांगल्या प्रतीची ५० किलोच्या पॉली पॉलिप्रॉपिलीन (P.P.) बॅगमध्ये खरेदी करुन तालुक्यातील शासकीय धान्य गोदाम येथे पुरवावी. बॅगाचे निव्वळ वजन १६० ग्रॅम असले पाहिजे.

७. सर्व तहसीलदार/गोदामपाल जालना, बदनापुर, भोकरदन, जाफ्राबाद, परतुर, मंठा, अंबड, घनसावंगी यांना देवुन कळविण्यात येते की, साखर पुरवठादार यांचेकडुन साखर एस-३० दर्जाची रिफाइन पांढरी शुभ्र चांगल्या प्रतीची असल्याबाबत प्रयोग शाळेचा अहवाल घेवुनच साखर शासकीय गोदामामध्ये साठवून घ्यावी.

14/5/18

**जिल्हा पुरवठा अधिकारी**
**जालना**

PUT UP